शनिवार दि.१८ जानेवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
-ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१२९ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# ऐकावे ते भयानकच... चक्क ठेकेदारांनी दिली सरपंचांना गाडीने उडण्याची धमकी

## सरपंचांची पोलिसात धाव; भ्रष्टाचारावर आवाज उठवाल तर नरडा दाबू हीच तालुक्याची अवस्था

### उत्कृष्ट कामे असतील तर तक्रारी करायला नागरिकांना कुत्रे चावली का...

जल जीवन मिशनच्या कामांबद्दल उपकार्यकारी अभियंता मालोकर यांच्या सोबत माध्यमांच्या प्रतिनिधींनी चर्चा केली असता त्यांनी संपूर्ण ठेकेदारांचीच बाजू घेतल्याचे समोर आले. मात्र जर कामे उत्कृष्ट झाली असे सर्वांचे म्हणणे असेल तर तालुक्यातील संपूर्ण कामांची चौकशी होऊ देण्यास काय हरकत आहे. निदान तक्रारी करणाऱ्यांच्या मनाला भरभरून समाधान लाभेल आणि कामे जर उत्कृष्ट होईल असेल तर माध्यमांना देखील संबंधित गावच्या ठेकेदार अधिकारी कर्मचारी यांच्या कामाबद्दल कौतुकास्पद लिहिता येईल. जेणेकरून कोणाच्या मनात भ्रम राहणार नाही. आणि कामे उत्कृष्ट झाली असे देखील म्हणता येईल कार्यकारी अभियंता यांनी डोळे उघडून आणि जागे होऊन लक्ष घालावे कोटी रुपये शासनाने खर्च केले की ठेकेदारांना श्रीमंत होण्यासाठी दिलीत याची एकदा सविस्तर माहिती माध्यमांना द्यावी जेणेकरून यापुढे वृत्त प्रकाशित करायचे काम पडणार नाही.

**हर घर जल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील पाणीटंचाई असलेल्या गावांची तहान भागवण्याची संकल्पना, याच संकल्पनेतून बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा तालुक्याला ८१ कोटी ६५ लाखाचे जलजीवांचे कामे शासनाने दिली. मागील दोन वर्षापासून त्या कामाला सुरुवात झाली आहे मात्र एकही गावचे काम पूर्ण झालेले नाहीत. दोन अडीच कोटींपेक्षाही जास्त रकमेची योजना प्रत्येक गावात देण्यात आली आहे. या योजनेतून प्रत्येक गावची तहान भागवले जाईल आणि गावातील प्रत्येक नागरिकाला पाणी मिळेल ही शासनाची संकल्पना.**




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

दि. १७ जाने रोजी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. तालुक्यातील वाघजई येथील सरपंच गजानन सानप यांना जल जीवन च्या ठेकेदाराने धमकी दिली आहे. तुला गाडीने उडवेल अशी जलजीवनचा ठेकेदार मानसिंग महादू कव्हले याने सरपंचाला धमकी दिली आहे.सविस्तर वृत्त असे की मातृत्व सिंदखेड राजा तालुक्यात मागील आठ दिवसापासून दैनिक लोकनेता, दैनिक मातृछाया, दैनिक भारत संग्राम, दैनिक बातमी जगत, या वृत्तपत्रांनी जल जीवन च्या




निकृष्ट कामांची बाजू उचलून धरल्याने व दिनांक ९ जानेवारी रोजी वाघजाई गावची फसवणूक करणाऱ्या ठेकेदारावर व कर्मचाऱ्यावर फौजदारी गुन्हे दाखल करा वाघजाई गावांमध्ये भीषण पाणीटंचाईची संकट असल्याची तक्रार गावचे प्रथम नागरिक सरपंच सानप यांनी उपविभागीय अभियंता यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. याचे वृत्त दैनिक लोकनेता व दैनिक मातृछाया या वृत्तपत्रांनी प्रकाशित केले होते. या गोष्टीला दहा दिवस ही न उलटता मधोमध ही इतर वृत्तपत्रांनी या जलजीवांच्या निकृष्ट कामाचे चौकशी व्हावी याचा सर्वांनी जोर धरला आहे. सरपंचांनी तक्रार केली म्हणून संबंधित गावच्या ठेकेदाराने चक्क गावच्या सरपंचाला तुला गाडीने उडवेल अशी धमकी दिल्याचा आरोप सरपंच गजानन सानप यांनी सिंदखेड राजा पोलीस स्टेशन येथे त्यांच्या विरोधात गुन्हा नोंदवून केला आहे. आता याकडे सर्वच तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागून आहे आज एका गावच्या प्रथम नागरिकाला ठेकेदार धमकी देत असेल तर गावातील इतर नागरिक या जल जीवन बद्दल बोलणार असेल तर त्यांच्यासोबत काय होईल याची भीती आता सर्वांच्या मनात तयार झाले आहे. याकडे सबंधित विभाग लक्ष देऊन अशा बंडखोर ठेकेदारावर कारवाई करेल की नाही? हा प्रश्न उपस्थित होत आहे.

### सरपंच संघटना संबंधित ठेकेदारावर कारवाई ची मागणी करणार-सरपंच संघटनेचे अध्यक्ष पालवे



घडलेल्या प्रकाराची माहिती जाणून घेण्यासाठी माध्यमांनी सरपंच संघटनेचे अध्यक्ष पालवे यांना भ्रमणध्वनी द्वारे संपर्क केला असता. फोन द्वारे या गोष्टीचा निषेध व्यक्त करत संबंधित ठेकेदारावर पुन्हा नोंद करून कारवाईचे मागणी करणार असल्याची माहिती तालुक्यातील सरपंचांच्या वतीने सरपंच संघटनेचे अध्यक्ष भगवान पालवे यांनी दिली.

### खबरदार इथून पुढे तक्रार घेऊन समोर येणार असेल तर मात्र तुम्हाला ठेकेदार धमकीच देईल

कामांच्या गुणवत्तेबाबत अनेक तक्रारी समोर आले आहेत. याबद्दल न बोललेलं बरं माध्यमांनी आवाज उठवल्यामुळे जल जीवन मिशनच्या अनेक तक्रारी समोर आल्या आहेत. आणि अध्यापही काही नागरिक माध्यमांसमोर आले नाहीत मात्र ते माध्यमांसमोर येण्याच्या तयारीत असताना जे तक्रारी घेऊन आलेत ज्यांनी उपविभागीय अभियंत्याकडे तक्रारी सादर केल्यात त्यांना जर ठेकेदार धमकी देण्याचे आरोप सरपंचांनी केले असतील तर इथून पुढे तालुक्यात असेच निकृष्ट कामे होत जाणार का? की, आता तरी जल जीवन मिशनच्या अधिकाऱ्यांचे डोळे उघडतील अशी चर्चा नागरिक आपापसात करत आहे.

### वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रारी दाखल होऊनही ते ॲक्शन मोडवर का नाहीत?

शासनाचे करोड रुपये खर्च होऊनहीं कामे पूर्ण नाहीत, साहजिक आहे असे कामे पूर्ण होत नसेल तर गावातील नागरिक याची तक्रार करेल परंतु ज्या नागरिकांनी तक्रार केली त्यांच्या समाधानाकरिता तरी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तपास केला आहे का? एक नाही तर अनेक तक्रारी या विभागाच्या आहेत असे असताना सुद्धा संबंधित अधिकारी मूग गिळून गप्प का! अशी चर्चा सर्वत्र सुरू आहे केवळ तक्रारीच नाही तर कोणत्या गावात काय अडचणी आहेत हे देखील वृत्तपत्रांनी प्रकाशित केले, मग ते केवळ नागरिकांच्या, शासकीय कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या मनोरंजनासाठी का? हा प्रश्न आता सर्वांच्या समोर उपस्थित होत आहे. जर याकडे संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी लक्ष घालत नसेल तर मग ठेकेदारांसोबत अधिकाऱ्यांची हात मिळवणी तर नाही ना २ वर्ष अखेर एकही गावचे काम पूर्ण नाही कोटींच्या योजना येऊन देखील गावे तहानलेलीच आहेत.

---

### रक्तरंजीत बीड जिल्हा पुन्हा हादरला

# जमावाच्या हल्ल्यात दोन सख्खे भाऊ मयत तर तिसरा जखमी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**



गुरूवारी वाहिरा येथे रात्री दहाच्या दरम्यान तीन सख्खा भावांवर त्याच्याच समाजातील काही लोकांना लोंखडी रॉड,धारदार शस्त्राने हल्ला केला. या हल्ल्यात दोन सख्खा भावांचा जागीच मृत्यू झाला.तर अन्य एक भाऊ गंभीर जखमी झाल्याची घटना अंभोरा पोलिस ठाणे हद्दीत घडली. अजय विलास भोसले,भरत विलास भोसले असे मयताचे नावे असून कृष्णा विलास भोसले हा गंभीर जखमी आहे.

आष्टी तालुक्यातील हातोळण येथील अजय विलास भोसले,भरत विलास भोसले,कृष्णा विलास भोसले हे तिघे भाऊ वाहिरा येथे गुरूवारी आले होते.याच ठिकाणी वाहिरा गावातील व बाहेरील काही लोक जमा झाले होते.गुरूवारी दुपारपासून हे सगळे याच ठिकाणी होते. रात्री साडे नऊ ते दहाच्या दरम्यान यातील काही लोकांनी या तीनही भावांवर लोंखडी रॉड,धारदार शस्त्राने हल्ला चढवला. या हल्ल्यात अजय विलास भोसले, भरत विलास भोसले या दोन सख्खा भावांचा जागीच मृत्यू झाला. तर तिसरा भाऊ कृष्णा विलास भोसले हा गंभीर जखमी झाला. असून त्याच्यावर अहिल्यानगर येथे उपचार सुरू आहेत. या घटनतेली सात संशयित आरोपीना अंभोरा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. हा खून का व कोणत्या कारणावरुन केला हे अद्याप समजले नाही.दोन्ही मृतदेह आष्टी ग्रामीण रूग्णालयात ठेवण्यात आले आहेत. घटनास्थळी अंभोरा पोलिस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे,पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत तावरे,बाबासाहेब गर्जे,मनोजकुमार खंडागळे,भरत माने,बाबुराव तांदळे, लुईस पवार,दत्तात्रय टकले, पोलीस अंमलदार शिवदास केदार,सतीश पैठणे अमोल शिरसाठ यांनी भेट देत मोठ्या शिताफिने सात संशयित आरोपीना पोलिसांनी ताब्यात घेतले.

# अवैध रेती उपसा करणारी बोटीत स्फोट करून इधन बोट व फायबर बोट उडविली

## खडकपूर्णा जलशयात महसूल व पोलीस विभागाची कारवाई

### तलाठी बुरकुल यांच्यावरील प्राण घातक हल्ल्यास वाळु माफियांना प्रशासनाने दिले चोक उत्तर





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

महसूल नायब तहसीलदार सायली जाधव या बायगांव येथील शेत रस्त्याची स्थळ पाहणी करून परतत असताना त्यांनी खडकपूर्णा धरणास आज दिनांक १७/ ०१ /२०२५ रोजी दिली असता त्या ठिकाणी त्यांना वाळू उपसा करताना फायबर बोट व इंधन बोट आढळून आल्या. त्यांनी तात्काळ त्यांच्या सोबत असलेल्या सहाय्यक महसूल अधिकारी उमेश गरकळ व वाहन चालक नरेंद्र उबाळे या कर्मचाऱ्यांच्या मदतीने जीव धोक्यात घालून सदर बोटी वाळू माफ्याच्या ताब्यातून जप्त केल्या व ताबडतोब तहसीलदार वैशाली डोंगरजाळ व उपविभागीय अधिकारी प्राध्यापक संजय खडसे यांना दूरध्वनी द्वारे माहिती दिली. सदर घटनेच्या ठिकाणी तात्काळ उपविभागीय अधिकारी सिंदखेड राजा प्रा. संजय खडसे व तहसीलदार देऊळगांवराजा वैशाली डोंगरजाळ या त्यांच्या पथकासह हजर झाल्या त्या ठिकाणी असलेल्या इंधन बोट व फायबर बोट उपविभागीय अधिकारी प्राध्यापक संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली जिलेटिन कांड्याच्या मदतीने स्पोट करून नष्ट केल्या, पाण्यात जाऊन धडाकेबाज कारवाई करण्यात आली

यावेळी निवासी नायब तहसीलदार डॉ.संतोष मुंडे, सिंदखेड राजा येथील महसूल नायब तहसिलदार डॉ. प्रवीणकुमार वराडे, महसूल सहाय्यक किशोर खांडेभराड, प्रशांत वाघ, तसेच सिंदखेड राजा येथील ग्राम महसूल अधिकारी राहुल देशमुख,पंकज देशमुख प्रदीप मोगल, संजय चव्हाण महसूल सहाय्यक संजय आटोळे व रामेश्वर खरात, पोलीस विभागाचे पोलीस शिपाई राज मोरे गजानन ढाले पवन दुनगहू हे हजर होते.

# भोकर तालुक्यातील अनेक ग्रामसेवक तालुक्यावरूनच हाकतात गावचा कारभार

## आपला ग्रामसेवक कोण हे ग्रामस्थांनाच माहीत नाही

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । रमाकांत जोशी**

भोकर येथील गटविकास अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने अनेक गावातील ग्रामसेवकांचा कारभार तालुक्यावरूनच सुरू असुन याही उपर कहर असा की काहींचा कारभार तर नांदेड वरूनच चालत असल्याने ग्रामस्थानाच आमच्या गावचा ग्रामसेवक कोण हे माहीत होत नाही त्यामुळे गावातील नागरिकांची अनेक कामे खोळंबली जात असून, याकडे आमदार सुश्री श्रीजया चव्हाण यांनी तात्काळ लक्ष देऊन मुख्यालयी न राहणाऱ्या ग्रामसेवकांविरूद्ध योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी सामान्य जनतेतून केली जात आहे.सामान्य जनतेचे लहान–मोठे असणारे प्रश्न वेळेवर व गावातच सुटावेत हा दूरदृष्टीकोन डोळ्यांसमोर ठेवून शासनाने ग्रामसेवकाना मुख्यालयायी रहाणे बंधनकारक केले मात्र या आदेशाला दस्तुर खुद्द माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या भोकर मतदार संघात केराची टोपली दाखवली जाात आहे.

**तेरी भी चूप अन् मेरी भी चूप**

पंचायत समिती कार्यालयातील आनेक ग्रामसेवक नांदेडहून दररोज अपडाऊन करीत असून आठवड्यातून एखाद–दोन वेळेस तालुक्याला येत आहेत नेमून दिलेल्या गावाचा तर रस्ताच माहीत नाही. काही गावांतील नागरिकांना आपला ग्रामसेवक कोण आहे हे ही माहीत नाही.स्वतः गटविकास आधिकारीच नांदेड वरून ये जा करत असल्याने बरेच मालदार व वतनदार ग्रामसेवक नांदेडलाच आपल्या फाईली काढून घेत आहेत. विशेष म्हणजे अश्या ग्रामसेवकांकडे चार ते पाच गावचा कारभार आहे. अन् काही ग्रामसेवकास गावच नसल्याने फुकट पगार घेत पंचायत समितीच्या भोवताल दिवसभर फिरताना दिसत आहेत. सरपंच यांनाच गाव सांभाळावे लागत आहे.




वित्त आयोगाच्या अंतिम बिलावर गुपचूप सही करून सरपंचांना निधी उचलून देणारे व घेणाऱ्या ग्रामसेवकांची आजमितीस चलती आहे.असे ग्रामसेवक राजे झाले आहेत. बऱ्याच ग्रामसेवकांच्या बॅगा खुद्द सरपंच सांभाळत आहेत. मग दाद कोठे मागावे असाही प्रश्न उपस्थित होत आहे.

**गटविकास अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाचा कामकाजावर परिणाम**

गटविकास अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने तालुकास्तरीय विविध कार्यालयांचे जबाबदार अधिकारी, कर्मचारी मुख्यालयात राहत नाहीत. त्यामुळे कार्यालयीन कामकाजावर मोठा परिणाम होत असून परिणामी सर्वसामान्यांची कामे निर्धारित वेळेत होतांना दिसत नाहीत. ग्रामस्थांना बरेच आधिकारी कर्मचारी ओळख नाहीत. कंत्राटी व रोजंदारी कर्मचारीच कामाचा गाडा हाकताना दिसुन येत आहेत.अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या 'अपडाऊन' प्रकाराकडे जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लक्ष द्यावे, अशी साधी सरळ मागणी सर्वसामान्य नागरिकांतून होताना दिसत आहे.

**पैश्याची मागणी वाढली**

पंचायत समिती म्हणजेच पैसा दया काम करून घ्या असे साधे सरळ सूत्रच रूढ झाले आहे. प्रत्येक कामाची टक्केवारी निश्चित करण्यात आली आहे. घरकुलाचे , विहिरीचे , रोजगार हमी योजनेच्या कामाचे बिले काढण्यासाठी संबंधित अधिकारी, कर्मचारी, ग्रामसेवक व अभियंता यांची डॉक्टरच्या फीस सारखी टक्केवारी निश्चित झालेली आहे. टक्केवारी दिले तर लगेच बिल नाही तर त्रुटी या गोंडस नावाखाली लाभधारकांना प. स कार्यालयात चकरा मारावे लागत आहेत..

# शरचंद्रपवार कॉलेज ऑफ फार्मसी राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराचे मोठ्या थाटात उद्घाटन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**ओतूर । मयूर ढोबळे**

श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालय आयोजित राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराला १६ जानेवारी २०२५ पासून प्रारंभ होत आहे. त्याप्रसंगी शिबिराचा उद्घाटन समारंभ मोठ्या थाटात संपन्न झाला. या वर्षी विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिराची थीम युथ फॉर माय भारत व युथ फॉर डिजिटल लिटरसी या विषयाला संबोधित असून विविध उपक्रम शिबिराच्या निमित्ताने आयोजित केले आहे. त्यामध्ये दंतचिकित्सक, रोगप्रतिकारक बूस्टर हर्बल औषधे, डिजिटल साक्षरता, स्वयंसेवक व समाज यांची नाते, स्वच्छता, बालविवाह प्रतिबंध, आरोग्य,योग, रस्ता सुरक्षा, अशा विविध महत्त्वाच्या विषयांवर प्रकाश टाकला जाणार आहे. उद्घाटन प्रसंगी प्राचार्य डॉ. गणेश दामा यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत करून राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे महत्त्व समजावून



सांगितले. अभ्यासालगत सामाजिक क्षेत्रामध्ये विद्यार्थी कशाप्रकारे सर्वांगीण विकास करू शकतो त्याचप्रमाणे स्वच्छता आरोग्य महिला सबलीकरण आदी विषयांवर भाष्य केले. तद्नंतर प्रमुख उपस्थिती श्री.लहू थाटे (ए पी आय ओतूर पोलीस स्टेशन) यांनी स्पर्धा परीक्षा,महिला सुरक्षा,व्यसनाधीनता, तरुणांमधील वाढती गुन्हेगारी या विषयांवर भाष्य केले. त्याचबरोबर श्री. जितेंद्र बिडवई(डिसेंट फाउंडेशन अध्यक्ष) यांनी देखील स्त्रियांचे प्राथमिक आरोग्य, कॅन्सर थेरेपी, कृषीप्रधान महाराष्ट्र, तरुण पिढीवरचे संस्कार, मोबाईलचा अतिवापर या महत्त्वाच्या विषयांवर भाष्य केले. संस्था अध्यक्ष श्री. विशाल तांबे, मानद सचिव श्री. वैभव तांबे, व संस्था उपाध्यक्ष श्री.हरी तांबे यांनी देखील ग्रामस्थांचे विशेष आभार मानून स्वयंसेवकांना पुढील शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या. एस.पी.सी.ओ. पी एनएसएस कॉर्डिनेटर डॉ. अस्मिता गायकवाड यांनी शिबिराचा कार्यकाळ १६ जानेवारी ते २२जानेवारी २०२५ दरम्यान होणाऱ्या कार्यक्रमांची घोषणा करून शिबिराची रूपरेषा समजावून सांगितली.उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवरांमध्ये उदापूर गावचे सरपंच मा.सचिन आंबेडकर, विद्या विकास मंडळ अध्यक्ष श्री. प्रभाकर शिंदे संस्थेचे उपाध्यक्ष श्री. श्रीहरी तांबे, मा. जिल्हा समन्वयक डॉ. श्रीकांत फुलसुंदर, डॉ. शिंदे, श्री जगताप ,श्री. अमित ठोसर, श्री सुदर्शन शिंदे, श्री. शेटे आदी... व्यासपीठावर उपस्थित होते. प्राचार्य आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली असणारी संपूर्ण टीम यांच्या प्रयत्नातून सदर शिबिर यशस्वीरित्या संपन्न होईल. सर्व कार्यक्रम यशस्वीता पार पाडले जातील असा विश्वास सर्व ग्रामस्थांनी व मान्यवरांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर्यन देशमुख व आभार प्रदर्शन कोमल चौधरी या स्वयंसेवकांनी अतिशय उत्कृष्टपणे पार पाडले.

# वै.मुक्ताबाई यशवंतराव पगारे यांच्या स्मृतीदिनानिमित्त वत्कृत्व स्पर्धा व मुक्ताई पुरस्कार वितरण समारंभ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नाशिक । प्रतिनिधी**

महात्मा फुले विद्या प्रसारक संस्था पिंपळनेर धुळे अध्यक्ष ड बापूसो. संभाजीराव यशवंतराव पगारे व त्यांच्या गावकीतील पगारे वाड्यातील भावकीतले आप्त पगारे बंधू यांच्या मातोस्त्री वै. मुक्ताबाई यशवंतराव पगारे यांच्या १० व्या स्मृती दिनानिमित्त वत्कृत्व स्पर्धा व मुक्ताई पुरस्कार प्रदान सोहळा शनिवार दिनांक २५ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ०३ वाजता आयोजित करण्यात आला असल्याची माहिती पगारे बंधूनी दिली. या सोहळ्यात आदर्श माता पुरस्काराच्या मानकरी मा. श्रीमती केशरबाई निंबा पगारे तर पदोन्नती पुरस्कार मा. विकास दादाजी नंदन यांना प्रदान करण्यात येणार आहे. विशेष पुरस्कार नवउद्योजक मा. प्रविण खंडेराव पवार, व संशोधन व लेखन पुरस्कार मा. प्राचार्य सौ. इंद्रायणी वरंदळ यांना प्रदान करण्यात येणार आहे. या सर्व पुरस्कारर्थींना शॉल श्रीफळ गौरवपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध कवी व साहित्यिक मा. विवेक उगलमुगले असतील तर प्रमुख वक्ते





म्हणून मा. प्रा. वैशाली पाटील समुपदेशक जय हिंद महाविद्यालय धुळे मा. सौ. अश्विनीताई बोरस्ते नाशिक बचतगट चळवळ प्रणेत्या उपस्थित राहणार आहेत. प्रमुख पाहुणे गावकुसाचे कवी साहित्यिक मा . साहेबराव नंदन तात्या, प्रकाशक, कवी, लेखक मा. तान्हाजी खोडे, छाया चित्रकार मा. अशोक पाटील कवी संजय आहेर उपस्थित राहाणार आहेत. या प्रसंगी आई या विषयावर दाजी साठे मेमोरियल इंग्लिश मेडीयम स्कूल पिंपळनेर सोमोडे रोड ता. साक्री पगारे शिक्षण संकुल येथे व्याख्या होणार असून, त्या अमृत विचाराचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन पगारे कुटूंबियांच्या व महात्मा फुले शिक्षण प्रसारक संस्थेचे सर्व मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर वर्गाने केले आहे.

# प्रशांत गाजरे यांच्या तबला वादनाने रसिक मंत्रमुग्ध

## मयुरी संगीत व सुरमयीलता संगीत विद्यालय वतीने उस्ताद झाकीर हुसैन यांना श्रद्धांजली



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**माधव । बैलकवाड नायगाव**

नायगाव शहरातील मयुरी संगीत विद्यालय व नरसी येथील सुरमयीलता संगीत विद्यालयाच्या वतीने पद्मभूषण उस्ताद झाकीर हुसेन यांना श्रद्धांजली अर्पण कार्यक्रमात तालयोगी पद्मश्री पंडित सुरेश तळवलकर यांचे शिष्य श्री प्रशांत गाजरे यांचा तबलावादन कार्यक्रम गुरुवर्य पंडित बाबुराव ऊप्पलवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला आहे.

उस्ताद झाकीर हुसेन यांना श्रद्धांजलीपर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गुरुवर्य पंडित बाबुराव ऊप्पलवार यासह तबलावादक प्रशांत गाजरे, नांदेड संगीतकार मंगेश जवळेकर, परभणी,शाहीर दिगु तुमवाड, बाबुराव लंगडापुरे, बासरी वादक ऐनोद्दीन वारसी, प्रकाश सोनकांबळे, संजय देशपांडे, बाळासाहेब पाटील, गंगाधर सुगावकर, बाळासाहेब पांडे, नागेश कल्याण यांची प्रमुख उपस्थिती होती प्रारंभी उस्ताद झाकीर हुसेन यांना सामूहिकरीत्या श्रद्धांजली अर्पण केल्यानंतर उपस्थित मान्यवरांचा सन्मान मयुरी संगीत विद्यालयाचे प्राध्यापक शंकर बिरादार व सुरमयीलता संगीत विद्यालयाचे संगीत शिक्षक नामदेव पांचाळ यांच्या वतीने करण्यात आला आणि प्रस्तावनेतून संजय देशपांडे यांनी उस्ताद झाकीर हुसेन यांच्या विषयी आपले मत व्यक्त केले.वस्ताद झाकीर हुसेन यांना श्रद्धांजली समर्पित करण्याच्या निमित्ताने स्वतंत्र तबला वादन श्री प्रशांत गाजरे, नांदेड यांनी केले तर लेहरासंगत मंगेश जवळेकर परभणी यांनी व टाळसंगत राघव जोशी यांची होती. श्री गाजरे यांनी पहिला पेशकार,पंजाब घराण्याचा कायदा, लयकारी रे ला,बंदिश या तीन ताल तबलावादनाने नायगाव शहरातील व्यंकटेश नगर व परिसरातील संगीत प्रेमी अक्षरांच्या न्हाऊन निघाले होते. सदर कार्यक्रमांचे सूत्रसंचालन माधवराव किन्हाळकर यांनी असून यावेळी पवन गादेवार, राजेंद्र बैस,वसंत माने, विजयकुमार द्रोणाचार्य,माधव भेदेकर,प्रा.ज्ञानेश्वर बैस,विश्वेश्वर जोशी, मंगेश देशपांडे, गणेश हाके,मनोज आरगुलवार, रामकिशन पांचाळ,संजय शेटकर,बाळू भेदेकर,गंगाधर दोंतुलवाड,ज्ञानेश्वर भत्ते,देविदास पांचाळ, गणेश पांचाळ यासह महिला पुरुष व संगीत विद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती.

# प्रभारी तहसीलदार प्रविण धानोरकर यांची मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाणघेवाण

## निमगाव वायाळ येथील शासकीय रेती घाटातून कोट्यवधी रुपयांची चोरी प्रकरणी अद्याप कारवाई गुलदस्त्यात ?

## रेती उत्खननावर कारवाई करण्यात महसूल विभागाची टोलवाटोलवी!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

निमगाव वायाळ येथील खडकपूर्णा नदीपात्रातून सन २०२४ मध्ये शासकीय ठेकेदार यांनी रेती उत्खनन परवाना घेतला असता या ठेकेदारांच्या कार्यक्षेत्रात कोट्यवधी रुपयांची रेती उत्खनन करून चोरी करण्यात आली होती या संबंधी स्थानिक महीला सरपंच सौ शीला रामेश्वर चाटे यांनी सदर रेती घाटातून झालेल्या अवैध रेती उत्खनन प्रकरणी मोजमाप करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली होती मात्र तत्कालीन प्रभारी तहसीलदार प्रविण धानोरकर यांनी मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाणघेवाण करून या घाटाची मोजमाप थांबविले होते मात्र महीला सरपंच चाटे यांनी आत्मदहनाचा इशारा दिला नंतर या घाटाचे मोजमाप सार्वजनिक बांधकाम विभाग देऊळगाव राजा मार्फत करण्यात आले मात्र तब्बल सात महिने उलटून ही अद्याप रेती चोरी प्रकरणी महसूल विभागाने कारवाई केली नाही याबाबत सविस्तर वृत्त असे की सन २०२४ मध्ये निमगाव वायाळ येथे शासकीय रेती उत्खनन व वाहतूक प्रकरणी

**याबाबत तक्रार कर्ते सामाजिक कार्यकर्ते यांनी माध्यमांशी शी बोलतांना सांगितले की सदर प्रकरण दडपण्यासाठी प्रयत्न करीत असून मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाणघेवाण केली असल्याने उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांचे मोबाईल चे सीडीआर तपासणी करण्याची मागणी करणार असून लोकशाही मार्गाने २६ जानेवारी पासून आमरण उपोषणाला बसणार असल्याचे सांगितले.**




शासकीय ठेकेदार निश्चित करून रेती उत्खननाची जबाबदारी दिली होती मात्र सदर ठेकेदाराने मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाणघेवाण करून मोठ्या प्रमाणात अवैध रेती उत्खनन केले होते या संबंधी मोठ्या प्रमाणात तक्रारी दाखल झाल्या नंतर उपविभागीय अधिकारी प्रा संजय खडसे यांनी निमगाव वायाळ येथे २४ तास बैठे पथक स्थापन केले असून या कालावधीत मोठ्या प्रमाणात अवैध रेती उत्खनन झाले होते या उत्खननाची सार्वजनिक बांधकाम विभाग मार्फत ३० मे रोजी मोजमाप करण्यात आले या मोजमापात सदर शासकीय रेती घाटातून १६२८१.५० ब्रास अवैध उत्खनन झाल्याचा अहवाल प्राप्त झाला असून या अवैध उत्खनन प्रकरणी अद्याप कारवाई करण्यात आली नाही मोजमाप झालयानंतर सामाजिक कार्यकर्ते उमेश नंदाजी हुसे,व गणेश एकनाथ हुसे, यांनी जिल्हाधिकारी व जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांकडे तक्रार करून बैठे पथकातील मौजे निमगाव वायाळ येथील अवैध तांत्रिक मोजणीनंतर तलाठी, मंडळ अधिकारी व तहसीलदार यांच्यावर जबाबदारी निश्चित करून पगार पत्रकातून कपात करून शिस्त भंगाची कारवाई करण्याची मागणी केली होती यानुसार जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी सिंदखेडराजा येथील उपविभागीय अधिकारी यांना १९ डिसेंबर २०२४ रोजी पत्र काढून सामाजिक कार्यकर्ते यांच्या तक्रार अर्जानुसार तक्रारीमध्ये नमूद सर्व मुद्दयाबाबत तात्काळ सविस्तर चौकशी करुन, आपला अहवाल व अभिप्राय या कार्यालयास सादर करावा.असे म्हटले असून अद्यापही उपविभागीय अधिकारी यांनी अहवाल सादर केला नसल्याने महसूल विभाग मात्र वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या पत्राची टोलवाटोलवी करीत असून १६२८१ ब्रास प्रकरणी आर्थिक देवाणघेवाण करून हे प्रकरण रफा दफा तर करत नाही ना हा यक्षप्रश्न निर्माण होत आहे.

# नांदेड जिल्ह्याच्या विकासासाठी कठीबद्ध-खा.रविंद्र पाटील चव्हाण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**

उमरी नांदेड लोकसभा मतदारसंघातून निवडून आलेले नवनिर्वाचित खा. रविंद्र पाटील चव्हाण यांचा उमरी तालुका काँग्रेस पक्षाच्या वतीने भव्य नागरी सत्कार समारंभ पार पडला आहे.मला कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या चळवळीचा अभ्यास नसताना केवळ वडिलांच्या निधनानंतर मला पक्षाने आदेश दिला व मला माझ्या सर्व महाविकास आघाडी व चव्हाण घराण्यावर प्रेम करणाऱ्या जनतेने निवडून देऊन मला संसदेत पाठवले याचा मला सार्थ अभिमान आहे .असे उद्गार खा. रविंद्र पाटील चव्हाण यांनी उमरी येथे झालेल्या सत्कार समारंभात बोलत होते.सकाळी शहरातील विविध ठिकाणच्या महापुरुषांच्या पुतळ्यांना हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले व राजयोग जनसंपर्क कार्यालय येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष गोविंदराव शिंदिकर होते.तर प्रमुख पाहुणे अब्दुल सत्तार, आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते सुरेश दादा गायकवाड, , भगवान मणुकर, शिरिष भाऊ देशमुख गोरठेकर यांनी मनोगत व्यक्त केले.खा.रविंद्र पा.चव्हाण पुढे बोलताना म्हणाले की, नांदेड जिल्ह्यातील महाविकास आघाडीची ताकद असताना सुद्धा अटितटी ची परिस्थिती निर्माण झाली होती एवढ्या कमी मतांनी विजयी झालो आहे ही निवडणूक पारदर्शक झाली आहे काय? असा प्रश्न पडला आहे आमचे नेते तथा लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी व मल्लिकार्जुन खर्गे यांनी निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल केली




होती.पण अजून ही उत्तर आले नाही.मि दोन हजार नवू पासून राजकारणात सक्रिय सहभाग घेऊन वडिलांनी जे काही काम सांगत होते ते मि करायचे.वढिलाच्या निधनानंतर पक्षाने आदेश दिला की तुम्ही पोट निवडणूक लढवा मी नवखा माणूस लोक सभा निवडणुकीत जिंकेल काय.ईथल्या सर्व कार्यकर्ते आमच्या वर प्रेम करणारे मानसं मला धीर देत कोणत्याही प्रकारची अपेक्षा न करता मला निवडून देऊन मला सर्वोच्च सभागृहात काम करण्याची संधी उपलब्ध करून दिली.असे भावनिक उद्गार खा. रविंद्र पाटील चव्हाण यांनी काढले.माझ्या वडिलांवर जेवढं प्रेम आपण केले आहे. तेवढेच प्रेम माझ्यावर तुम्ही करत आहात याची जाणीव मला आहे.नांदेड जिल्ह्याच्या राजकारणात अनेक बदल झाले आहेत. पक्ष सोडून गेले तरी कांहीं फरक पडत नाही. मी जिल्ह्यातील विकासकांना महत्त्व देऊन जे प्रश्न प्रलंबित आहेत ते सोडविण्यासाठी कटीबद्ध असल्याची ग्वाही खा.चव्हाण यांनी उपस्थितांना दिली. या कार्यक्रमाचं प्रास्ताविक प्रल्हाद पाटील ढगे यांनी केले. तर सुत्रसंचलन जाधव सर कुदळेकर आणि आभार मानसिंग ताटे यांनी मानले .या कार्यक्रमाला उमरी व परिसरातील असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# माहूर येथील मेंडकी परिसरातील नैसर्गिक टेकड्यांचे सौदर्य नष्ट होण्याच्या मार्गावर

## श्चमाहूर तालुक्यातील चित्र; मुरुमांसाठी उत्खनन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**माहूर । राजकिरण देशमूख**

माहूर तालुक्यातील मेंडकी परिसरात मोठ्या प्रमाणात नैसर्गिक टेकड्यांनी सौदर्यात भर घातली आहे.मात्र नैसर्गिक सौदर्य धोक्यात घालून या टेकड्यांचे मुरुमांसाठी सर्रास खनन करीत आहेत. त्यामुळे नैसर्गिक टेकड्यांचे सौदर्यच धोक्यात आले असून उत्खनणामुळे पडणाऱ्या खड्ड्यामुळे नागरिकांना धोका निर्माण झाला आहे .



**माहूर तालुक्यातील मेंडकी येथील टेकड्या ह्या अवैध उत्खनणामुळे धोक्यात आल्या असून याकडे माहूर वनविभागाचे दुर्लक्ष होत आहे. (छाया : राजकिरण देशमुख )**

माहूर तालुक्यातील जंगल शिवारात सागवान वृक्ष मोठ्या प्रमाणात असून वन संपत्ती मोठ्या प्रमाणात आहे मेंडकी परिसरात फार पूर्वीपासून नैसर्गिक टेकड्या निर्माण झाल्या आहेत या नैसर्गिक टेकड्या मेंडकी परिसराच्या सौदर्यात भर घालतात परंतु या पुरातन निसर्ग निर्मित सोंदर्याने नटलेल्या टेकड्यावर मुरूम तस्करानी घाव घातल्याने या टेकड्या नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. या टेकड्यांना कोरून सर्रास येथील मातीचा वापर मुरूम म्हणून रस्त्याच्या कामात करताना दिसत आहे.मेंडकी परिसरात रस्त्यालगत असलेल्या टेकड्यांचे सौदर्यच आता नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.जंगलाचे संरक्षण करण्याची जबाबदारी ही वनविभागाकडे असताना सुद्धा याकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत आहे .मेंडकी परिसरातील वन विभागाचे कर्मचारी मुख्यालयी राहत नसल्याने मेंडकी परिसरसतील जंगल धोक्यात आले आहे .नैसर्गिक टेकड्यांचे अस्तित्व जोपासून उत्खनन थांबवावे अशी मागणी होत आहे.या प्रकरणाबाबत माहूर चे वन परीक्षेत्र अधिकारी रोहित जाधव यांचेशी संपर्क करून प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही.

# डिजिटल मिडिया परिषदेच्या शेगांव तालुकाध्यक्ष पदी विवेक शेगांवकर तर उपाध्यक्ष पदी इस्माईल शेख

## नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्ती देऊन सन्मानित



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**शेगांव । ज्ञानेश्वर बुधवत**

मराठी पत्रिका परिषदेचे मुख्य विश्वस्थ माननीय श्री. एस. एम. देशमुख सर यांच्या आदेशानुसार मराठी पत्रकार परिषद संलग्नित असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेची शेगांव तालुका कार्यकारिणी गठित करण्यात आली.

डिजिटल मीडिया परिषदेच्या माध्यमातून शेगाव तालुक्यात संघटनात्मक सक्रिय काम केल्याबद्दल राज्य उपाध्यक्ष अनिलजी उंबरकर, बुलढाणा जिल्हाध्यक्ष श्रीधर ढगे, जिल्हा उपाध्यक्ष नारायण दाभाडे यांच्या हस्ते शेगाव येथील पत्रकार विवेक शेगावकर यांची डिजिटल मिडिया परिषद शेगाव तालुका अध्यक्षपदी तर इस्माईल शेख यांची शेगाव तालुका उपाध्यक्षपदी, विजय खंडेराव यांची तालुका संघटकपदी तर संतोष देठे पाटील यांची तालुका संघटक पदी निवड करण्यात आली.

# आ.राहुल कुल यांच्याकडे दौंड शहरातील समस्यां सोडविण्याची नंदू पवार यांनी केली मागणी !

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

दौंड शहरातील अनेक समस्यांबाबत माजी नगराध्यक्ष आणि नगरसेवक नंदू पवार यांनी आमदार राहुल कुल यांचेकडे शहरातील अनेक समस्यांचा पाढाच वाचला आणि लेखी मागणी केली,याबाबत सविस्तर माहिती अशी की

गेले अनेक वर्षे नगरपालिका हद्द वाढीचा प्रश्न प्रलंबित आहे.तसेच या हद्दवाढीबरोबर मोठ्या प्रमाणात आजूबाजूच्या ग्रामपंचायतीचे हद्द नगरपालिकेत समावेश करणे गरजेचे आहे.

उदा.गोपाळवाडी,सोनवडी,लिंगाळी, गिरीम,मेरगळ वाडी,खोरवडी जर या प्रमाणात हद्दवाद झाली तर शहराच्या विकासासाठी गती मिळणार आहे.शहरातील चारही बाजूच्या झोपडपट्टी वासीयांसाठी गृहनिर्माण,म्हाडा,समाज कल्याण व पंतप्रधान अशा योजने मार्फत सर्व झोपडपट्टीचा विकास करण्यात यावा.रेल्वेच्या हद्दीत रेल्वे मालकीच्या शहरातील जागा नगरपालिका विकासासाठी ९९ वर्षाच्या करारावर घेण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडे मागणी करावी. नगरपालिकेने अनेक वर्षापासून खाजगी मालकांच्या जागेवर आरक्षण टाकलेले आहे.परंतु सदरील आरक्षीत केलेल्या जागा आजपर्यंत विकसित करण्यात आलेल्या नाहीत,त्या विकसित करण्यात याव्यात. शहराच्या दोन्ही भागामध्ये स्त्री-पुरुषांना सार्वजनिक शौचालय / मुतारी नसल्याने त्या बांधण्यात याव्यात. शहरामधील कुटुंबांना व लहान मुलांना मनोरजंन आणि खेळण्यासाठी उद्यान विकसित करण्यात यावे व नविन उद्यान बनवण्यात यावे. शहरातील पार्किंगला शिस्त लावणे गरजेचे आहे. शहरालगत शैक्षणिक संकुलन उभे करण्यात यावे. तालुक्यामध्ये जनरल एम.आय.डी.सी. निर्माण करणे






गरजेचे आहे.त्यामुळे तरूण मुला-मुलींची बेकारीची संख्या घटू शकते. शहरातील नगरपालिकेचा पाण्याचा जुना साठवण तलाव वाढत्या लोकसंख्येचा विचार करून त्या तलावाची वाढ करणेचा प्रस्ताव करण्यात यावा. भिमा नदीकाठी शहराच्या लगत असणारे बेकायदेशीर वीट-भट्टीचे अतिक्रमण हटविणे गरजेचे आहे जेणेकरून दशक्रिया घाटावर नागरिकांना आल्यावर पार्किंग व बसण्याची सोय होईल. शहराच्या नविन भागामध्ये चोरीचे तसेच गुन्हेगारीचे प्रमाण वाढत असलेने नागरिकांच्या सोयीसाठी नविन पोलीस चौकी निर्माण करणे गरजेचे आहे. शहराच्या अनेक भागामध्ये रेल्वेचे उघडे असलेले गटार रेल्वे खात्याकडून त्या बंदिस्त स्वरूपाच्या करून नागरिकांचे आरोग्य सांभाळणे गरजेचे आहे. नव्याने झालेले दौंड कॉर्ड लाईन स्टेशनचा विकास करणे गरजेचे आहे. प्रवाशांना त्या स्टेशनवर जाण्या-येण्यासाठी व इतर सुविधा मिळणेकामी फार त्रास सहन करावा लागत आहे.उदा. ट्रान्सपोर्ट चोरी एकट्या महीलेची सुरक्षा ईत्यादी. शहरातील पाणि पुरवठा करणेचे योग्य नियोजन करणे तसेच कचऱ्याचे देखील बऱ्याच वर्षापासून विल्हेवाट लावणेचा प्रश्न प्रलंबित आहे.अश्या अनेक प्रश्न आपण तालुक्याचे आमदार असल्याने तातडीने सोडवाल अशा प्रकारची आम्हाला खात्री वाटते अशी लेखी मागणी नंदू पवार यांनी आमदार राहुल कुल यांचेकडे केली आहे.

# उमरी ते धानोरा बु.रोड साईडला वाढलेल्या झुडूपांमुळे वाहनचालकांना त्रास!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**

उमरी तालुक्यातील धानोरा बु.वाघाळा उमरी पर्यंतच्या रस्त्याची दुरुस्ती करण्यात येत नाही .रस्त्याचे काम खड्डे अतिशय निकृष्ट दोन्ही बाजूने साईडला झाडी झुडपे कॉर्नरला अचानक गाडी समोरासमोर येणे अपघात होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. आजूबाजूला मुख्य रस्त्याच्या कडेला खड्डेच खड्डे पडल्याने अनेक वेळा वाहन पलटी होत असून, दरम्यान रात्रीच्यावेळी रस्त्यावरून प्रवास करणे एक प्रकाचे मृत्यूलाच आमंत्रण दिल्यासारखे आहे.उमरी धानोरा बु.हा रस्ता हा एक पदरी असल्याने मोठ्या संख्येने वाहन चालकात तफावत होऊन अपघात होतात.या मार्गावर दोन्ही बाजूंनी काटेरी झाडे मोठ्या प्रमाणात वाढल्याने वाहन चालकांना रात्री व दिवसाच्या वेळी अनेक प्राणी केव्हा गाडी समोरून जाऊ लागली तेही कळत नाही.अनेक वेळेस अपघतही झालेले आहेत.वाघाळा धानोरा बु.करखेली पर्यंतच्या रस्त्याच्या दुतर्फा बाजुने काटेरी झाडे मोठ्या प्रमाणात वाढल्याने दुचाकी वाहन व चार चाकी वाहनांना मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे.उमरी धानोरा,या रस्त्यावरील काटेरी झाडे काढण्याची मागणी वाहन चालकातून होत आहे.या रस्त्यावर अनेक जागोजागी शेतकरी पाईट लाईट साठी रोड खोदतो पाईप टाकून भरणी टाकत नाहीत रात्रीला धोकादायक आहेत संबंधित रोड व फुलाचे काम करणाऱ्या गुत्तेदारावर प्रशासन मेहेरबान



असल्याने हे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले आहे. सदरील कामाची पहाणी वरीष्ठ अधिकाऱ्यांकडून झाली पाहिजे अशी मागणी जनतेतून होत आहे. मुळात या रस्त्याचे खड्डेच निकृष्ट दर्जाचे काम केली आहे.

उच्चस्तरीय चौकशी करून गुन्हे दाखल करण्याची मागणी या मार्गाच्या मजबुतीकरणसाठी सर्वच राजकीय स्तरातून ओरड झाल्यानंतरही हा रस्ता करण्यास टाळाटाळ करीत आहेत आला. या रस्त्याचे कामे आधुन मधून थातूरमातूर झाल्याच्या तक्रारी आहेत. ह्या रस्त्यावर पावसाळ्यात पुन्हा जशास तसे खड्डे पडतील, यात काही शंका नाही. तेव्हा या रस्त्याचे कामे रोड बाजुचे काटेरी झुडपे तोडून चांगला रस्ता करावे,रस्ता व वाघाळा फुलाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात येत आहे.वाघाळा फुल रात्रीला धोकादायक आहे संबंधित रोड व फुलाचे काम करणाऱ्या गुत्तेदारावर प्रशासन मेहेरबान असल्याच चित्र दिसून येत.बांधकाम विभाग झोपेच सोंग घेऊन मुग गिळून गप्प आहे.आमदार खासदार साहेबांनी याकडे लक्ष देतील का?अशी चर्चा नागरिकांतून होत आहे.

# पंचायत समितीच्या आवारातून जेष्ठ सेवा निवृत्त कर्मचाऱ्याचे पन्नास हजार रुपये लंपास

## पंचायत समितीचे कॅमेरे सुरु असते तर वृध्दाचे पन्नास हजार वाचले असते

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेडराजा । सुरेश हुसे**

सिंदखेडराजा तालुक्यातील साठेगाव येथील सेवानिवृत्त कर्मचारी नागरे यांचे ५० हजार रुपये लुना मोटारसायकल वरील पन्नास हजार रूपायांची रक्कम भरदिवसा अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना १६ जानेवारी रोजी दुपारी १२ ते१ वाजे दरम्यान घडली आहे .याबाबत सविस्तर वृत्त असे की साठेगाव येथील सेवानिवृत्त औषध निर्माता संखाराम तुकाराम नागरे वय ८५ यांनी दवाखान्यात जाण्यासाठी सिंदखेडराजा येथील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेतून एक लाख रुपये रक्कम काढली या रकमेतील पाचशे रुपये नोटांचे एक बंडल खिशात ठेवले व १०० रूपये नोटांचे पाच बंडल काळया रंगाच्या हॅंड बॅग लुना मोटारसायकलच्या हॅनडला लटकवून पंचायत समिती आवारात आले असता त्यांना दम लागल्यामुळे पंचायत समिती आवारातील पाण्याच्या टाकीजवळ बसले यावेळी अज्ञात चोरट्यांनी लुना मोटारसायकलच्या हॅनडला लावलेली पन्नास हजार रुपये किंमतीची हॅंड बॅग चोरून नेली ज्यावेळी सेवानिवृत्त जेष्ठ नागरिक आपल्या लुना मोटारसायकल कडे आले त्यावेळी लुना मोटारसायकला लटकवलेली हॅंड बॅग चोरी झाल्याचे निदर्शनास आले यावेळी जेष्ठ नागरिकांनी सदर प्रकरणची तक्रार सिंदखेडराजा पोलिस स्टेशन दाखल केली यावरून सिंदखेडराजा पोलिसांनी सिंदखेडराजा पंचायत समितीच्या आवारात पाहणी केली असता येथील सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याचे निदर्शनास आले सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या तक्रारी वरून सिंदखेडराजा पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरोधत गुन्हा केला असून पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल अनिल खार्डे करीत आहे

माहोर प्रभारी गटविकास अधिकारी यांच्याकडे देऊळगाव राजा आणि सिंदखेडराजा पंचायत समितीचा कार्यभार असल्यामुळे एक दिवस सिंदखेडराजा एक दिवस देऊळगाव राजा असे कामकाज चालू असते त्यांच्या या कामकाजावर तालुका सरपंच संघटना ही नाराज आहे. तालुक्यातील जनता विकास कामासाठी सिंदखेडराजा पंचायत समितीमध्ये आल्यानंतर गटविकास अधिकारी गायब असतो त्यामुळे सर्वसामान्य जनता ही नाराज आहे. सिंदखेड राजाला कायम स्वरुपी गटविकास अधिकारी मिळेल का असा सूर सुद्धा सर्वसामान्य जनतेतून निघत आहे...

### प्रभारी गटविकास अधिकारी यांच्या काळात तिसरा डोळा बंद

**सिंदखेड राजा पंचायत समिती सिंदखेड राजा मध्ये शासनाने लाखो रुपये खर्च करून सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत. पण या कॅमेऱ्याचा कोणताही उपयोग या पंचायत समितीच्या कामासाठी होताना दिसून येत नाही. तत्कालीन गटविकास अधिकारी वेणीकर यांच्या कालखंडामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे चालू होते. परंतु आज प्रभारी गटविकास अधिकारी यांनी पदभार मोहर यांनी स्वीकारल्या पासून सीसीटीव्ही कॅमेरे बंदच आहेत.**

# स्मशानभुमी जागा उपलब्ध करून द्या अन्यथा कलेक्टर ऑफीला बेमुदत अमरण उपोषण करू

## स्मशानभुमीच्या प्रश्नावर रिपब्लिकन सेना पुन्हा अक्रामक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**



बिलोली तालुक्यातील मौ. कार्ला खु ता. बिलोली या गावचे पुनर्वसन १९८२-८३ च्या दरम्यान अतिवृष्टीने आलेल्या महापुरामुळे झालेले आहे. कार्ला खुर्द या गावात मुस्लिम धर्मीय बांधव, बोध्द धर्मीय बांधव हिंदु धर्मीय बांधव वास्तव्यास आहेत. या पुनर्वसन झालेल्या गावात धार्मिक व सामाजिक व सार्वजनिक कुठली स्मशान भुमी उपलब्ध नाही. गावातील एखादी व्यक्ती मरण पावल्यास त्यांची अंत्यविधीसाठी जुन्या गावात पावसाळ्यात चिखल, काटे कुपाडे मधुन व, उन्हाळ्यामध्ये उणाची चटके खात ४ ते ५ किलोमीटर खांद्यावरून प्रेत यात्रा घेऊन जावे लागत आहे. ही हाल अपेष्टा गेली ४० वर्षापासुन सर्व समाज बांधव सहन करत आहे सदरील बाबींचा विचार करून जिल्हा प्रशासनाने गावातील धार्मिक किंवा सामाजिक अथवा शासकिय सार्वजनिक स्मशानभुमी उपलब्ध करून द्यावे, अशा आशयाचा निवेदन अनेक वेळा प्रशासनाला दिले असुन व आक्रोष मोर्चा उपविभागीय अधिकारी कार्यालय बिलोली येथे दि. ०९ ऑगस्ट २०२३ रोजी कार्ला खुर्द येथील नागरींकाडुन रिपब्लीकन सेनेच्या माध्यमातुन काढण्यात आले असुन, अद्याप त्या गावाला प्रशासनाकडुन कोणतेही उपाया योजना करण्यात आलेली नाही. त्या मुळे कार्ला खु येथील तरूण मंडळी व सामाजीक कार्यकर्ते यांनी दि. १५ जानेवारी २०२५ रोजी मा. कलेक्टर कडे संबीत जागा उपलब्ध करून देण्याची विनंती निवेदना द्वारे केली आहे. जागा उपलब्ध झाली नाही तर, २४ जानेवारी २०२५ पासुन कलेक्टर ऑफीस समोर बेमदत अमरण उपोषण करणार असल्याचे सदर निवेदनावर नमुद केले आहे. त्यावर उपोषण कर्ते म्हणुन गंगाधर ईबीतकर रिपब्लीकन सेना ता. अध्यक्ष, अलिम शेख, वाजीद शेख, शुभम कुडकेकर, सद्दाम शेख, मारोती कांबळे सामाजीक कार्यकर्ता आदींच्या स्वाक्ष-या आहेत.

## माजी आमदार सुभाष साबणे यांच्या प्रयत्नाने

# पर्यटन विकास योजनेअंतर्गत एक कोटी रुपये मंजूर निधीचे भूमिपूजन मा.आ.सुभाष साबणे यांच्या हस्ते

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । जयपाल दावनगीरकर**



तालुक्यातील मौजे शहापूर येथे पर्यटन विकास योजने अंतर्गत माजी आमदार उत्कृष्ट संसदपट्टू सुभाष साबणे यांच्या अथक प्रयत्नाने एक कोटी रुपयांचे निधी मिळवून दिले असून काल दिनांक १६ जानेवारी रोजी मंजूर निधीच्या कामाचे भूमिपूजन माजी आमदार उत्कृष्ट संसदपट्टू सुभाष सामने यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले.

यावेळी उपस्थित मंगल देशमुख, बाबू पाटील आलूरकर, अवधूत भारती, संतोष पाटील, नारायण पाटील रमतापूरकर, माजी सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती देगलूर यादव फिरंगे, बालाजी ताटे पाटील, सरपंच सौ संगीताबाई लक्ष्मण भंडारे, उपसरपंच गणेश चामावार, गंगारेड्डी कोटगीरे ग्रेडर, माजी जिल्हा परिषद सदस्य मल्लन मामा चिंतलवार, माजी जिल्हा परिषद सदस्य शिवाजी मामा कनकंटे, माजी सरपंच बालाजी कनकंटे, विठ्ठलरेड्डी पुल्लागोर, दंडोड राजेंद्र, विठ्ठल-रुक्मिणी मंदिर देवस्थानचे अध्यक्ष गंगारेड्डी तुकाराम कोटगिरे, सचिव कुंटुरे मारुती, संजय मुळगे, संतोष भुपतवार, मल्लरेड्डी यालावार, नरसारेड्डी यालावार, कॅप्टन गंगरेड्डी यालावार, एस.गंगारेड्डी यालावार व तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# दिपभारती विद्यालयात प्रजासत्ताक दिना निमित्त शालेय क्रीडा स्पर्धेचे आयोजन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । राम शिंदे**

सम्राट अशोक शिक्षण संस्था भोकरदन संचलित दिपभारती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय दानापूर येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त शालेय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे .शाळेचे ज्येष्ठ शिक्षक श्री वाय.एच.कापरे यांनी क्रिडा स्पर्धेचे उद्घाटन केले . या स्पर्धेत खो-खो ,कबड्डी , धावणे , रिले दौड , लिंबू- चमचा , गोळा फेक या व इतर सांघिक व वैयक्तिक खेळांचे आयोजन करण्यातआलेले आहे .स्पर्धेतअनेक विद्यार्थी व विद्यार्थीनींनी मोठ्या संख्येने व उत्साहाने सहभागी होऊन स्पर्धेची धडाक्यात सुरुवात केली .शालेय क्रिडा स्पर्धेसाठी संस्थेचे अध्यक्ष श्री सुदामराव सदाशिवे व सचिव श्री दिपक भैय्या सदाशिवे यांनी शालेय क्रिडा स्पर्धेसाठी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले .

# महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शिक्षक संघटना देगलूर तालुकाध्यक्ष पदी लोणे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । जयपाल दावनगीरकर**



महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी अधिकारी संघटनेच्या देगलूर तालुका अध्यक्षपदी गंगाधर लोणे पाटील यांची निवड करण्यात आली.

नोंदणीकृत महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी अधिकारी संघटना देगलूर तालुका शाखा निवडीची बैठक यशवंत सहकारी पतसंस्थेच्या सभागृहात १६ जानेवारी रोजी जिल्हाध्यक्षा विजया घिसेवाड यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा कार्याध्यक्ष एम.बी. शेख, जिल्हा समन्वयक गंगाधर मावले, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख बि.एस.सरोदे, यांच्या प्रमुख उपस्थितीत देगलूर तालुका कार्यकारणीची निवड करण्यात आली.तालूका अध्यक्ष गंगाधर लोणे पाटील, सचिव नागनाथ माधवराव चलमले, सहसचिव डि.बी.दोडे, कार्याध्यक्ष बि.एच. पाटील, कोषाध्यक्ष व्हि.एन. वडजे, बालाजी एकनाथराव जाधव, उपाध्यक्ष वाय. व्ही. कोलमकर, गंगाधर कोसंबे, एम. के. मनियार, सल्लागार मनोहर माली पाटील, एस. आर. शिंदे, बालाजी मामडे महिला प्रतिनिधी अनिता दामोधर वट्टमवार, सविता सायन्ना मुलूकवार संघटक एस.एस.पाटील, पि. एन. केरले, पि.बी. धुमाळे यांची निवड झाल्याचे जिल्हाध्यक्षा विजया घिसेवाड यांनी घोषणा केली असून याचवेळी निवड झालेल्या सेवानिवृत्त अध्यक्षासह सर्व सन्माननीय सदस्य व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सन्मान पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.

# चार महिन्यांपासून निराधारांचे थकलेले अनुदान द्या अन्यथा बेरोजगार दिव्यांग संघटनेच्या वतीने तहसीलदारांना घेराव : राहुल साळवे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

संजय गांधी निराधार योजनेचा मुख्य उद्देश समाजातील दुर्बल घटकांना आर्थिक मदत करून त्यांचे जीवनमान उंचावणे असा आहे, अशा घटकांनी समाजातील इतर घटकांवर अवलंबून न राहता स्वतःला आत्मविश्वासाने जगता यावे म्हणून ही योजना महाराष्ट्र सरकार सामाजिक न्याय विभागाच्या वतीने सुरू केलेली आहे, या योजनेअंतर्गत, निराधार व्यक्तींना आर्थिक सहाय्य म्हणून सध्या दरमहा पंधराशे रुपये मानधन दिले जाते परंतु सप्टेंबर - आक्टोंबर २०२४ पासून ते आतापर्यंत नांदेड शहर व जिल्ह्यातील काही तालुक्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील लाभार्थ्यांना अद्याप मानधन मिळाले नसल्यामुळे अंध-दिव्यांग, अनाथ मुले, मोठ्या आजाराने ग्रस्त व्यक्ती, वयोवृद्ध, विधवा, घटस्फोटीत महिला, परित्यक्ता महिला, अत्याचारी महिला या सर्व लाभार्थ्यांवर सध्या वाढत्या महागाईमुळे उपासमारीची वेळ येवून ठेपली आहे. शासन स्तरावरून मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या माध्यमातून लाडक्या बहिणींना दरमहा मानधन दिले जाते परंतु संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील लाभार्थ्यांना गत चार - चार महिन्यांपासून मानधन दिले जात नाही, वर्षभरात बारा महिनेही लाभार्थ्यांकडून दरमहा डिबीटीच्या नावाने कागदपत्रे गोळा करून काहिना काही तांत्रिक अडचणी पुढे करून त्यांची अवहेलना केली जात आहे हि राज्यासह देशाची फार मोठी शोकांतिका असल्याचे म्हणत बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष राहुल साळवे यांनी संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील मानधन लाभार्थ्यांच्या खात्यात त्वरित जमा करण्यात यावे अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे तसेच मानधन जमा न झाल्यास पुढील आठवड्यात कुठलीच पुर्वसुचना न देता जिल्हाधिकारी कार्यालय येथील संजय गांधी निराधार अनुदान योजना कार्यालयात शेकडो लाभार्थ्यांसह तहसीलदार यांना व संबंधित सर्वच तालुक्यातील तहसीलदारांना घेराव घालण्यात येणार असल्याचे आज एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे म्हटले आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904